श्री गणेशदत्त गुरुभ्यो नमः

परमपूज्य श्रींनी **कर्म** या विषयावर विविध
प्रवचनांमधून मांडलेले विचार साधकांच्या
<u>सोयीसाठी एकत्र करुन पुढे मांडले आहेत</u>

पूर्वी केलेला प्रयत्न म्हणजे दैव आणि सध्या चालू असलेला प्रयत्न म्हणजे **कर्म** असें म्हणतात. पुण्य किंवा पाप -कोणतेही कर्म घडल तरी त्याचे फळ निश्चित मिळते. ईश्वरानेच त्या कर्माची शक्ती निर्माण केली आहे. किंवा कर्म करणा-याच्या "मी करतो आहे" अशा अहंकारामुळेही कर्मांत शक्ती निर्माण होते.
"तस्मै नमः कर्मणे" म्हणतात. कर्म हेच नमस्कारार्थ आहे. कर्म हाच ईश्वर आहे. कर्तव्य कर्म करीत राहिले पाहिजे. कर्म करताना किर्तीची अपेक्षा मनामध्ये उत्पन्न झाली तर कर्मामध्ये न्यूनता येते. अपूर्णता कायम राहाते.

ध्रुवाने खडतर तपश्चर्या करुन सर्वोच्च स्थान मिळवले पण त्याला नंतर पश्चाताप झाला. "काय मागितले आपण" असे त्याला वाटले. सर्वोच्च स्थानामध्ये राहायचे म्हणजे इतर हेवा करणारच. द्वेष करणा-या मंडळींकडून विरोध झाला म्हणजे मिळालेले स्थान, सुख टिकेल की नाही याबद्दल मनांत शंका येणारच. मग अशा प्रतिबंधांमुळे सुख कसे लाभणार ? शिवाय सर्वोच्च स्थान मिळाल्यामुळे अहंकार वाढीस लागून ईश्वराकडे लक्ष कमी होणार.

"सकाम कर्म नको" असे जे म्हणतात ते या करता. पण तशी आपली एकदम भूमिका होत नाही. कर्माबद्दल अभिमान निर्माण झाला की सर्व कर्म दोषी होतात. आपल्या हातून शुद्ध कर्म होत नाही.

आपण कर्म करताना पूर्वीच्या कर्माचा, पापपुण्याचा, नीतिअनीतिचा कशाचाही विचार करत नाही. आपण सुखी व्हावे एवढाच एक विचार मनांत असतो. यातून देहात्मवाद निर्माण होतो. देहात्मवाद सुटल्याशिवाय निर्भयता उत्पन्न होत नाही आणि त्यामुळे कर्माबद्दल विचारही होऊ शकत नाही. न्याय अन्यायाकडे दुर्लक्ष करुन कर्म घडतात आणि एकाला असे कर्म करताना पाहून दुसराही तेच करतो. त्याला जर अशा अनीतिच्या मार्गाने जाऊन सुख मिळते तर मग मीही तसेच कां करु नये, असे विचार प्रबल होतात. आणि तसे घडून सामुदायिक दुरित तयार होतात. अशी दुरित समाजात तयार झाली की ती पुढे राष्ट्रात व पर्यायाने विश्वात निर्माण होऊन सुख नाहीसे होते. म्हणून ज्ञानेश्वर महाराज म्हणतात -

दुरितांचे तिमीर जावो ......

वैयक्तिक आणि सामुदायिक दुरित कर्मांचा क्षय व्हायला पाहिजे.

कर्म मानावे लागते. पुनर्जन्म मानावा लागतो. एकाला कर्माचे फळ मिळते पण तेच कर्म करणा-या दुस-याला ते फळ मिळत नाही. यावरुन त्या जीवाचे पूर्व कर्म कांही तरी प्रतिबंध निर्माण करते असे मानणे भाग पडते.

कर्माला स्वतःचे ज्ञान नाही. ते अचेतन, क्रियाहीन आहे. जीवाने कोणते कर्म केले आहे हे जाणणारा कोणी तरी लागतो, म्हणजे तो त्याचे फळ देतो. आम्ही सत्कर्म किंवा दुष्कर्म केली तरी ती विसरुन जातो. आणि विसरुन जरी गेलो तरी आमच्या कर्माचे फळ कधी मिळायचे हे आमच्या हातात किंवा आमच्या इच्छेवर अवलंबून नाही.

कर्ममार्ग तर कठिणच आहे.

ज्ञानेश्वर महाराज सांगतात, अनंत जन्म जर सुकृते घडली तर आपला पापक्षय होतो. आणि आपले मन ईश्वराकडे लागते. प्रेम त्याच्याबद्दल निर्माण होते. म्हणून पुण्यकर्मे केली पाहिजेत.

ईश्वराच्या दर्शनानें, आत्मज्ञानानें सर्व कर्मांचा क्षय होतो.

शास्त्रीय कर्मयोग आणि व्यावहारिक कर्मयोग वेगळा वेगळा आहे. वर्णाश्रम विहित कर्मे निराळी. कर्मयोगाचे अनेक प्रकार शास्त्राने दाखवले आहेत.

ईश्वराचे अस्तित्व मान्य करुन त्याच्या भक्तीने कर्मयोगाची पूर्णता होऊ शकते मग ती कर्मे शास्त्रीय असो अगर व्यावहारिक. भगवान् गीतेत सांगतात मनाने, वाणीने, शरीराने होणारे प्रत्येक कर्म मला अर्पण करा.

तत्कुरुष्व मदर्पणम्

हा भक्तीयोगाचा संबंध कर्मयोगातही आणला आहे. कर्मयोग पक्का होण्याकरता, कर्मयोगाने बुद्धितले दोष दूर होण्याकरता म्हणून 'मदर्पणम्' म्हणजे ईश्वरार्पण बुद्धि भगवत्गीतेमध्ये मुख्य दाखवली आहे.

कांही कर्तव्य कर्म आपण करु लागलो - जपयज्ञ, पोथीवाचन इ. गुरुचरित्र वाचतात बरीच मंडळी ते वाङ्‌मय तप आहे. प्रदक्षिणा घालणे, पायी तीर्थयात्रा करणें वगैरे शारीरिक तप आहे. तसेच मानसिक तपही आहे - ध्यान, धारणा, चिंतन इ. ही कर्मे जरी आमच्या बुद्धिने समजून घेऊन आपल्याला करावीशी वाटली तरी ती ईश्वरार्पण बुद्धिने व्हायला पाहिजेत.

कर्मयोगामध्ये ईश्वरानुसंधानाला विशेष महत्व आहे. अशा कर्मयोगाने मनाला शांती मिळते, मनाचे दोष निघून जातात. मग तो कर्मयोग पारमार्थिक असो किंवा सांसारिक अथवा व्यावहारिक असो. आपल्या हातून जे कांही कर्म घडतय - साधना वगैरे सुध्दा - ते सर्वही ईश्वराला अर्पण करणे. त्याची आज्ञा म्हणून मी साधना करतोय. माझ्या कडून जो कांही साधनाभ्यास होतोय तो त्याच्याच प्रेरणेने, त्याच्याच शक्तीने होतोय ही बुद्धि धारण करुन कर्म करा एवढेच सांगताहेत शास्त्रकार.

तेव्हां कर्माचरण करताना 'योग्रकर्मसुकौशलम्' म्हणून जे सांगतात ते जर साध्य झाले तर मग कर्म व्यावहारिक असो किंवा पारमार्थिक असो व्यवस्थित होऊ शकते.

भगवत् भक्ती आणि निरहंकार वृत्ती मनांत धारण करुन घडणारे कर्म म्हणजेच भागवत धर्म आहे. सर्वही कर्म मला अर्पण कर म्हणजे तो भक्तीयोगच आहे. भागवत धर्म आहे. मन हे कर्माचे ~~कर्माचे~~ मुख्य साधन आहे.

पापकर्म कोणचे आणि पुण्यकर्म कोणचे हे आपल्या बुद्धिने आपण ठरवू शकत नाही. ते शास्त्रानेच समजून येणार.

जीव हा कर्माच्या अधीन आहे. कर्मामुळे जीवदशा प्राप्त होऊन पुन्हा पुन्हा जन्म घ्यावे लागतात. पूर्वजन्मात बुद्धिवर झालेले संस्कार पुढील जन्मातही अभिवृत्त होतात. "बुद्धि कर्मानुसारीणी" म्हणतात. पूर्व कर्मानुसार स्वभाव बनत असतो. म्हणून चांगली बुद्धि होण्याकरता चांगलीच कर्म केली पाहिजेत.

भक्तीचे सहाय्य झाल्याशिवाय कर्म शुद्ध होत नाही. शुद्ध कर्म झाल्याशिवाय आपली प्रकृती ही दैवी प्रकृती होणार नाही. त्यासाठी स्वतःला वारंवार तपासले पाहिजे. रोज रात्री निजताना सकाळपासून आपण कसे वागलो याचे अवलोकन करुन निजावे म्हणतात. मी आज पशुसारखा वागलो की सत्पुरुषांसारखा वागलो हे निदान पहाव तरी विचार करुन.

सत्कर्म योगे वय घालवावे

समर्थांचे सांगणे आहे. सबंध आयुष्य हे सत्कर्म करण्यात गेले पाहिजे.

आज मी अमक्याला अमूक बोललो, तमक्या विषयी अनुद्गार काढले, अमक्याची निंदा केली, त्याच्या मनाला मी उद्वेग दिला, हे बरं झालं नाही. अशी उपरती होऊन आपल्या हातून घडलेले कर्म चांगले झाले नाही असें वाटले तर सुधारण्याची शक्यता आहे.

भगवान् म्हणतात, सर्व कर्म मला अर्पण कर. कर्म किंवा क्रिया अर्पण कशा करायच्या ? क्रिया काय हातात घेऊन देता येण्यासारखा पदार्थ आहे का ? कर्म ईश्वरार्पण करणं याचा अर्थ कर्माचा कर्ता मी नाही ही भावना दृढ करणं. प्रत्येक कर्म करताना निरहंकार वृत्ती झाली पाहिजे. म्हणजे कर्माची शक्ती संपली. कर्मामध्ये जीवाला जन्म मरण द्यायची जी शक्ती आहे ती निरहंकार वृत्तीने कर्म घडले की जाते. कर्म करताना बुद्धि निरहंकार होणं हीच ईश्वरार्पण बुद्धि आहे. वस्तुतः कर्तृत्व आपले नाही हे शास्त्रप्रमाणाने आणि सिद्ध महात्म्यांच्या सांगण्यावरुन आपल्याला कळून येतय. त्याप्रमाणें कर्म कशी करावीत हे समजून घेतले पाहिजे. बुद्धिला तो विषय द्यायचा आहे. कर्तृत्व आपलं नाही. क्रिया\कर्म शक्तीही परमेश्वराची आहे: हे पक्कं समजल्यावर अहंकार राहु शकत नाही.

कर्म यथा सांग होत नाही. आपल्या मनाकडून, इंद्रियाकडून, शरीराकडून अनेक दोष घडत असतात. आपल्या कडून निर्दोष कर्मानुष्ठान होत नाही. आपण कितीही लक्ष दिले, दक्ष राहिलो तरी आपल्याकडून कर्मानुष्ठान करताना चुका होतात. म्हणून प्रत्येक कर्म शेवटी भगवंताला अर्पण करायचे, त्याचे स्मरण करायचे. आपले कर्म पूर्ण झाले अशी मनाची समजूत करुन घ्यायची आहे. नाही तर रोज कर्म करीत असताना आपल्या हातून अमूक चूक झाली तमूक स्खलन घडले असेच सारखे वाटत राहिले तर मनाला समाधान कसे मिळेल ? म्हणून उपनिषदामध्ये कर्मानुष्ठानाबरोबर उपासना, भक्ती याचेही आचरण झाले पाहिजे, हा मोठा शास्त्रीय सिद्धांत सांगितला आहे.

कर्मानुष्ठान करण्याबद्दल मनामध्ये अत्यंत प्रेम निर्माण झाले पाहिजे, श्रद्धा निर्माण झाली पाहिजे.

तया सत्कर्मी रति वाढो
म्हणताहेत ज्ञानराज. सत्कर्म करण्याकरता म्हणून करायचे नाहीये.

कर्म करीत असतानासुध्दा ती ईश्वराची आज्ञा आहे, ते वेद विहित आहे अशी भावना हवी. वेद म्हणजे ईश्वराचे स्वरुप आहे ना त्यांनी सांगितलेले कर्म न करणे म्हणजे आज्ञाभंग होणार नाही का ? तेव्हां ते अत्यंत प्रेमाने, आदराने, श्रद्धेने झाले पाहिजे. पण तसे होत असतानाही अनेक दोष होण्याचा संभव असतो. ते दोष दूर करण्याकरता भगवत् भक्तीही अंतःकरणामध्ये पाहिजे. कर्मफलदाता एक पूर्ण ईश्वर शक्ती आहे. इतकेच नव्हे तर कर्म करण्याची आपल्याला जी बुद्धि होते त्या बुद्धिला प्रेरणा करणारीही तीच शक्ती आहे. ही भावना दृढ व्हायला पाहिजे. अहंकारादि दोषामुळे कर्मामध्ये कमी जास्तीपणा निर्माण होतो. त्याचे फलही मोठ मोठयांना भोगावे लागते.

काल आणि कर्म यांच्या सहाय्याने ईश्वर सृष्टी निर्माण करतो असा एक सिद्धांत आहे.

जीवाला सुखदुःख कां भोगावी लागतात ? जीवाने केलेल्या कर्मामुळे.
भोगणे ते फळ संचिताचे
समर्थही तेच सांगतात.

श्रद्धा आणि ज्ञानपूर्वक केलेले कर्म अधिक चांगले होते.

ईश्वराकडून मिळालेली बुद्धि स्वतंत्र आहे आणि आपल्या कर्माप्रमाणें मिळालेली बुद्धि स्वतंत्र आहे. पापकर्म झाल्यानंतर तशाच वासना तयार होतात. पुन्हा जन्माला आल्यानंतर त्या वासनांप्रमाणे पापाकडेच प्रवृत्ती होणार.
बुद्धि कर्मानुसारिणी
म्हणून सिद्धांत आहे.

अत्युत्कटैः पापपुण्यैः
इहैव फलमुच्यते
म्हणतात. कर्माचे फल मिळायला वेळ लागतो. धर्माचे किंवा अधर्माचे फल मिळायला वेळ लागतो. आंब्याचे झाड लावल्यावर लगेच आंबे कसे मिळणार ? कांही वर्षे जावी लागतात. मग आंबे मिळतील तसे आहे.

शास्त्रकार सांगतात, एखाद्याने पाप केल्यावर त्याचे फल त्याला त्या जन्मात मिळाले नाही म्हणून तो आपण सुटलो असें वाटून जर निश्चिंत झाला तर त्याचा तो भ्रम आहे. पुढे काय आहे हे त्याचे त्याला कळेल. त्याला भोगावे लागले नाही तर मुलांना ते फल भोगावे लागते. मुलांना भोगावे लागले नाही तर नातवाला भोगावे लागते. आपल्या हातून घडणारे पापकर्म किंवा धर्म कधीही निष्फल होत नाही.

देवाला आमच्या दुःखासाठी दोष देण्यात अर्थ नाही. आम्ही जी कर्मे केली आहेत त्याप्रमाणें आमची बुद्धि तयार झालेली आहे. त्या बुद्धिकडून कार्य करुन घेणारी फक्त ईश्वर शक्ती आहे. कारयिता ईश्वर आहे त्याच्यावर सर्व सोपवून देऊन भागणार नाही. आपण कर्म केलेले आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. आपण कर्म करीत असताना चांगले कर्म असेल तेवढेच करायचे. ज्ञानी महात्मे, सज्जन मंडळी कशी वागतात त्यांचे आपण अनुकरण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

ज्यांच्या मनामध्ये थोडे बहुत धर्म संस्कार आहेत अशांकडूनही इच्छा असली तरी कर्म पूर्ण होतेच असे नाही. दृष्ट, अदृष्ट अनेक प्रकारचे प्रतिबंध कर्म मार्गात निर्माण होतात त्यामुळे ज्ञानप्राप्तीसाठी, ईश्वरप्राप्तीसाठी केलेल्या प्रयत्नांना समाधानकारक यश येत नाही. कर्माचा प्रतिबंध आहे. योगशास्त्रामध्ये हे सर्व प्रतिबंध सांगितले आहेत.

अकर्मण्यता हा पहिला प्रतिबंध आहे. कंटाळा, काय उगीच किती करायचे ? रोज ज्ञानेश्वरी वाचून काय करायचय ? झाले की पुष्कळ वाचन. वर्षातून एकदा नामसप्ताह असतो त्या वेळी ज्ञानेश्वरी वाचावी, पुष्कळ झाले तेवढे, वगैरे विचार मनांत येऊन आपल्याला कर्म करण्यापासून परावृत्त करतात.

प्रपंच्याचा नाही तो कंटाळा येत ? रोज जेवायचा नाही तो कंटाळा येत ? पण रोज देवदर्शनाला कशाला जायला पाहिजे, दर वर्षी वाडीला जायला पाहिजे, अनेक वेळा ज्ञानेश्वरी कशाला वाचायला पाहिजे असे विचार आमच्या मनांत येतात आणि पुन्हा ते बरोबर आहे असे वाटते. आणि वर आम्ही दुस-याला सांगतो - तुम्ही तरी इतके कशाला करता ? म्हणजे आपली बुद्धि भ्रष्ट झालेली आहे पण ती बरोबर आहे असे वाटून आम्ही दुस-याला उपदेश करतो.

कर्माप्रमाणें सुख दुःख प्राप्त होतात हे बुद्धिला पटणे ही बुद्धिची शुद्धि आहे.

कर्म म्हणजे क्रिया. चांगले बोलणे. सत्य बोलणे. शरीराने कोणाला पीडा वगैरे न करणे. मनातसुध्दा चांगले विचार येणे. या मनाच्या, शरीराच्या इंद्रियांच्या क्रिया आहेत. क्रिया कसे फल देतील ? क्रियेला काय समजते ? कोणाला सुख द्यायचे व कोणाला नाही हे क्रियेला समजते का ? म्हणून कर्मफलाचे विवरण करताना व्यास महर्षि थोडे पुढे गेलेत. मीमांसाकारांनी सर्व योगामध्ये कर्मयोगच सांगितलेला आहे असा सिद्धांत त्यांनी मांडला पण त्याच्याबद्दल ते उदासीन राहिले. कर्म प्रधान आहे. कर्माचरण शेवटपर्यंत केले पाहिजे हे जैमिनीमहर्षिंनी सांगितले.

परंतु नुसत्या धर्माचरणाने किंवा अधर्माचरणाने फल उत्पन्न होणार नाही. क्रिया जाणणारा कोणी नको का ? "ह्याने पुण्य केले आहे" समजणारा कोणी तरी असला पाहिजे. हे जाणणारा फक्त सर्वज्ञ ईश्वरच आहे. ईश्वराबद्दल आस्तिक्य बुद्धि निर्माण होणें हे धर्माचरणाचे फल आहे असे निश्चित मनाने सांगता येते. ईश्वर हा फलदाता आहे हा सिद्धांत वेदव्यास मुनिंनी मांडला आहे.